पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/ ९/कावि/४३५ /२०१६
दिनांक : १०/११/२०१६

प्रति,


मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोंव्हेंबर-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार, दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**कार्यपत्रिका क्रमांक ६५**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोव्हेबर-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार, दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**मा.स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्रमांक १)** संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/२/कावि/३५९/२०१६ दि.१०/१०/२०१६
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१८०३८ दि.१५.१०.२०१६

मनपा मुख्य कार्यालय इमारत आवारातील उपहारगृह त्यांचे क्षेत्रफळ ५९० चौ.फु. ही मिळकत नगररचना विभागाने पाच वर्षासाठी ठरवून दिलेला लिजदर र.रु.२१६०/-प्रती चौ.फु. नुसार येणारी लिज र.रु.१२,७४,८१०/- प्रमाणे ५ वर्ष कालावधीसाठी ई-निविदा सुचना क्र. ८/२०१६ प्रसिध्द करण्यात आले होते. सदरकामी ७ निविदा प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा पात्र ठरलेल्या आहेत. सदरकामी निविदा मधील सर्वोच्च दर र.रु.२७,२५,२५०/- हा मे.साईसेवा एंटरप्रायजेस श्री. सुरेश नामदेव ढवळे यांनी दर सादर केला आहे. मे.साईसेवा एंटरप्रायजेस श्री सुरेश नामदेव ढवळे या निविदाधारकांची निविदा ही निविदा दरापेक्षा ११३.७७% जास्त (रक्कम रुपये २७,२५,२५०/- (अक्षरी रक्कम रुपये सत्ताविस लाख पंचविस हजार दोनशे पन्नास फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता

करीत असलेने ५ वर्ष कालावधीसाठी लीजदराने देणेकामी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

--------

## मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे

**विषय क्रमांक २)** संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. स्वभाअक/३/कावि/३९/२०१६ दिनांक ४ /११/२०१६

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासनव राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | १,२४,९६,०००/- | २,४९,९२,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,६७,०३,०००/-** | **२,६३,९१,००० /-** |
|  |  | **केंद्रशासन व राज्य शासन एकूणअनुदान** | **४,३०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१०/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ८०३६ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ६११७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ४०४६ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३४९२ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३११७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३९९१ लाभार्थी | GOI+GOM=२३९.४६लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =७९.९२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३१९.३८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | २२४४ लाभार्थी | GOI+GOM=१३४.६४ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हिस्सा |
| | | ULB =४४.८८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१७९.५२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

--------

## समित्यांचे अहवाल

### मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ३)** अ) दि.२४/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१४/१०/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### मा.शहर सुधारणा समिती


**विषय क्रमांक ४)** अ) दि.१८/८/२०१६ व दि.१/९/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१/९/२०१६ व दि.१२/९/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दि.१४/१०/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

**विषय क्रमांक ५)** अ) दि. ७/९/२०१६ दि. १२/९/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. १४/१०/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणे.

**-----**



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/९/कावि/४३५/२०१६
दिनांक : १०/११/२०१६
टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस)
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.